# प्रकरण दुसरे

## 'साहित्याचे परिशिलन आणि संशोधन पद्धती'

# प्रकरण दुसरे

## साहित्याचे परिशिलन आणि संशोधन पध्दती

## (Review of Literature and Research Methodology)

### प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये एकूण दोन विभाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या विभागात 'कोल्हापूर शहरातील महिला पोलीसांचा समाजशास्त्रीय अभ्यास' या शीर्षकाला अनुसरून असलेल्या उपलब्ध साहित्याच्या परिशिलनावरून आधीच्या संशोधनातील प्रमुख निष्कर्षाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. तसेच 'महिला पोलीस' आणि 'पोलीस' या विषयाला अनुसरून असणाऱ्या साहित्याचा आढावा घेतला आहे. ज्याद्वारे प्रस्तुत संशोधनात अनेक महत्वपूर्ण संदर्भ मिळाले ते पुढीलप्रमाणे :-

विभाग पहिला

साहित्याचे परिशिलन

**(Review of Literature)**

१) **Dr. Mahajan Amarjit** यांच्या **'Indian Police Women'** या पुस्तकात भारतीय 'स्त्री' चा पुरूषांची मक्तेदारी असलेल्या पोलीस दलातील साहसपूर्ण प्रवेश आणि तिची 'नवी – पोलीस भूमिका' याची रूपरेषा स्पष्ट केली आहे. या पुस्तकात (अभ्यासात) त्यांनी 'स्त्री-प्रधान' नसणाऱ्या व्यवसायातील तिचा प्रवेश, या प्रवेशाला प्रेरित करणारे घटक, तडजोडी, अडचणी यांना सामना देणे, त्यांच्याबरोबर कशी टक्कर देतात यांचा शोध घेतला आहे. त्यानुसार 'आर्थिक – अनिवार्यता' हा घटक महिलांना 'नवी-पोलीस भूमिका' स्वीकारण्यास प्रेरित करतो. तिची व्यावसायिक तडजोड, तिच्या पतीच्या मिळकतीवर आणि त्याच्या (पतीच्या) तिच्या कामावरच्या (पोलीस) पसंतीवर अवलंबून आहे. तिला प्रशिक्षण पूर्ण करताना अनेक पेच प्रसंगांना सामोरे जावे लागते. जसे महिला पोलीसांना आपली भूमिका सादर करताना पोलीस व्यवस्थेत अनुकूल वातावरण मिळत नाही. आणि समाजाकडून महिला पोलीसांना नकारात्मक मान्यता मिळाली आहे की ज्यामुळे त्यांना वाईट वागणूक मिळते.

त्याचप्रमाणे महिला पोलीसांच्या नातेवाईकांच्या, संबंधाच्या नकारात्मक प्रतिक्रिया त्यांच्यात (महिला पोलीस) ताण-तणावांची निर्मिती करतात. संघटनेत (पोलीस दलात) महिला पोलीस आणि त्यांचे पुरूष सहकारी यांचे संबंध फारसे विकसित झालेले नाहीत. महिला पोलीसांकडे पोलीस अधिकारी म्हणून न पाहता प्रथमत: एक 'स्त्री' म्हणूनच पाहिले जाते की, ज्यामुळे त्यांना पुरूषांप्रमाणे (पोलीस) ड्युटी दिल्या जात नाहीत. एकूण पाहता, त्यांच्या शोधातून त्यांनी 'पोलीस संस्कृतीतील मूल्यांशी स्त्री दीर्घ काळ समायोजन साधू शकत नाही' असे मांडले आहे.[१] (**Dr. A. Mahajan - 1981 : 175-177**)

प्रस्तुत लघु शोध निबंधात, महिला पोलीसांची आर्थिक सुरक्षितता, तिला कराव्या लागणाऱ्या तडजोडी, ताण-तणाव, समाजाचा नकारात्मक दृष्टीकोन, तिच्यावर पडणाऱ्या (पोलीस भूमिका) मर्यादा या संदर्भाचा 'महिला पोलीसांची सामाजिक-आर्थिक स्थिती दर्शविताना' उपयोग झाला.

२) **Shamim Aleem** यांच्या **'Women Police and Social Change'** (१९८१) हे पुस्तक म्हणजे त्यांच्या **'Women Police as an Instrument of Social Change'** या शोध प्रकल्पाची फलनिष्पत्ती असून यात पहिल्या भागात 'भारतातील महिला पोलीसांचा दर्जा' तर दुसऱ्या भागात 'महिला पोलीसांच्या कार्याचा आणि भूमिकेचा' गांभीर्यपूर्वक अभ्यास केला आहे.

प्रामुख्याने त्यांनी आंध्रप्रदेशातील महिला पोलीसांचा दर्जा, वाढ, नियुक्ती, प्रशिक्षण, बढती, कार्य आणि भूमिका यावर प्रकाश टाकला आहे. त्यातील निष्कर्षानुसार, महिला पोलीसांच्या संख्या वाढीचा अभाव, नियुक्ती धोरणांचा अभाव आहे. मिळणारे ट्रेनिंग (प्रशिक्षण) कामासंबंधीत नसते. उदा. शोध कार्य, लैंगिक गुन्हे, छळवणूक, हुंडाबळी इत्यादी विशेष विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही. बहुसंख्य महिलांना एकही बढती मिळालेली नाही. तर कार्याचा आणि भूमिकेचा विचार करता महिलांना वैयक्तिकरित्या गुन्हा अन्वेषणाची कामे दिली जात नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर काही अंशी संघटनात्मक ताण-तणाव पडल्याचे दिसून आले. शमिम अलिम म्हणतात, स्त्रियांच्या अंगी पुरूषांपेक्षा काही विशिष्ट गुण असतात की, ज्यामुळे त्या पुरूषांपेक्षा अधिक उत्कृष्टरित्या आपले काम, जबाबदारी पार पाडतात.[२]

(**Shamim Aleem : 1991 : 81 - 83**)

या पुस्तकाचा प्रस्तुत शोध निबंधातील पोलीस स्त्रियांवर पडणाऱ्या मर्यादा, त्यांची पुरूषांपेक्षा उत्कृष्ट कामगिरी समजून घेण्यासाठी उपयोग झाला.

३) **Ghosh S.K.** यांच्या **'Women in Policing'** (१९८१) या पुस्तकात भारत आणि इतर लोकशाही राष्ट्रातील काम करणाऱ्या महिला पोलीसांचा इतिहास विस्तृतरित्या स्पष्ट केला आहे. आणि महिला पोलीसांची कायदा सुव्यवस्थेतील भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या अभ्यासावरून ही गोष्ट खरी आहे की, स्त्रिया सामान्यत: पुरूषांइतक्या बलशाली नसल्या तरी विविध देशातील स्त्रियांचा पोलीस दलातील प्रवेश पाहताना त्यांची पोलीस दलामध्ये असणारी आवश्यकता स्पष्ट होते. आक्रमकता, हल्लेखोरता आणि शारीरिकदृष्ट्या बलवान ही म्हणजे 'चांगला पोलीस' अशी पोलीसांची व्याख्या नाही, तर लक्षपूर्वक ऐकणे, संवेदनशीलता, समजूतदारपणा आणि मानवी कर्तव्यदक्षता ही सर्व वैशिष्ट्ये गुणी पोलीस अधिकाऱ्यासाठी आवश्यक असतात. आणि हे सर्व गुण पुरूष पोलीसांपेक्षा महिला पोलीसांमध्ये जास्त असतात. त्याचप्रमाणे पोलीस दलातील स्त्री-प्रतिनिधी आणि एक स्त्री या नात्याने ती सामाजिक जाणीवा लोकांपुढे मांडते. ज्या पोलीस-जनता संवादासाठी आवश्यक आहे, तसेच अल्पवयीन गुन्हेगार, वेश्या व्यवसाय, स्त्रिया आणि मुली यांना पळवून नेणे, त्यांचे अपहरण करणे असे गुन्हे असणाऱ्या क्षेत्रात त्याचप्रमाणे कैदी महिलांच्या सुरक्षेसाठी, काही पुरूष पोलीसांकडून होणाऱ्या छळवणूकीपासून त्यांना संरक्षण देण्यासाठी महिलांचा उपयोग होतो. काही देशांमध्ये वेश्या व्यवसायाला विरोध करण्यासाठीचे सर्व कायदे महिला पोलीसांच्या हातात असतात.

कायदा सुव्यवस्थेच्या माध्यमातून सण-उत्सव काळात मोठमोठे रेल्वे स्टेशन्स अशा ठिकाणी स्त्रिया, हरवलेल्या मुलांना एकत्र आणण्यासाठी महिला पोलीसांचा उपयोग होतो. जनता आणि पोलीस यांच्या संबंधात सुधारणा करण्यासाठी महिला पोलीसांची भूमिका महत्वपूर्ण ठरते.[३] (**Ghosh S. K. : 1981 : 138 - 140**)

४) वागळे वि.द. लिखित, 'पोलीस आणि समाज' हे पुस्तक म्हणजे, 'जो समाज आज पोलीसांपासून दूर चालला आहे, त्याला (समाजाला) जवळ आणण्यासाठी पोलीसांच्या कामाची माहिती देण्याचा केलेला प्रयत्न आहे. त्यासाठी या पुस्तकात पहिल्या खबरीपासून

पोलीस तपासाची सर्व अंगे हाताळली आहेत आणि शेवटचे प्रकरण आरोपपत्राबद्दलचे आहे. म्हणजे गुन्ह्याच्या तपासाचा संपूर्ण उहापोह यात आहे'. या पुस्तकात वागळे यांनी पोलीसी वास्तविकता सादर केली आहे. ते म्हणतात,

समाजास वाटते तसे पोलीस हे फक्त 'हडेल हप्पीचा' वारसा घेऊन आले नाहीत. त्यांचे काम विशेषत: गुन्ह्याच्या शोधाचे महाकठीण असते. तपासासाठी महत्प्रयास करावे लागतात. आपली बुध्दी पणाला लावावी लागते. अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्रास, चिकाटी, कल्पकबुध्दी, एक प्रकारचे उपजत अंतर्ज्ञान, शोध घेताना एखादा छोटा धागाही तात्काळ पकडण्याची चलाखी, त्या धाग्याच्या आधारे शेवटपर्यंत जाण्याची चिकाटी. त्यात गुन्हेगारही आजकाल तितकाच हुशार असतो. त्याला गुन्ह्यासाठी आधुनिक साधने मिळू शकतात. त्याच्याकडून सुगावा मागे न ठेवला गेल्याची दक्षता. इतके असूनही पोलीस त्यावर मात करून आरोपीस गजाआड करतात.

शांतता व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्याचा प्रतिबंध आणि शोध, शिवाय समाजातील घटकांचे व त्यांच्या चीज वस्तूंचे संरक्षण या गोष्टी मुख्यत्वे पोलीसांच्या कर्तव्यात मोडतात. याशिवाय इतर गोष्टींकडे लक्ष पुरवावे लागते. दिवसरात्रीची गस्त, जनसमुदायावर नियंत्रण, रहदारीचे नियंत्रण, भटक्या व नवीन उपऱ्या लोकांवर लक्ष ठेवणे, थिएटर, देवालये अशा ठिकाणी नियंत्रण, आग लागलेल्या ठिकाणी लोकांचे व त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण, प्रदूषणापासून जनतेचे रक्षण, हॉटेलवर देखरेख, दारूड्यांचा आणि समाज कंटकांचा बंदोबस्त, फेरीवाल्यांशी मुकाबला शिवाय मिरवणूक, जाहीर सभा, संप, लॉक आऊट, गैर कॅश अशा शेकडो गोष्टींकडे त्यांना लक्ष द्यावे लागते.

इतका भार शिरावर घेऊनही समाजास पोलीसांबद्दल सहसा कौतुक तर नसतेच, पण एक प्रकारचा आकस असतो. खरे म्हणजे सर्व पोलीसांची कर्तव्ये व्यवस्थित पार पाडणे हे पोलीस आणि समाज यांच्या सहकारावर अवलंबून असते.[४] (वि.द.वागळे : १९८९ : १४ – १५)

प्रस्तुत लघु शोधनिबंधासाठी 'महाराष्ट्र राज्य पोलीस यंत्रणेचा' उदय आणि विकास जाणून घेण्यासाठी या पुस्तकाचा उपयोग झाला.

५) खोपडे सुरेश लिखित 'नवी दिशा – पोलीस प्रशासनाची नवी दिशा' हे पुस्तक आहे. यामध्ये तळाचा पोलीस कर्मचारी त्याला मिळणाऱ्या मोबदल्यात प्रभावी आणि

परिणामकारकपणे का सेवा करीत नाही ? या प्रश्नातून त्यांनी कर्मचारी आणि अधिकारी यांना प्रेरित करण्याऱ्या सिध्दांताचा व प्रयोगाचा अभ्यास करून, पोलीस दलाची कार्यक्षमता, प्रभावीपणा वाढविण्याचे केलेले वेगवेगळे नाविन्यपूर्ण प्रयोग यांचा आढावा आहे. नोकरशाहीच नाही तर नोकरशाहीतील वातावरणाचा (**Ecology of Public Administration**) यात आढावा घेतलेला आहे. यामध्ये भिवंडी प्रयोग, मोहल्ला शांतता कमिटी, त्याला सहकाऱ्यांचा विरोध, एस.आर.पी. मधील प्रयोग, पोलीस मॅन्युअल, पोलीस चौकटीतील नवीन प्रयोग, पोलीस कर्मचाऱ्यांचे जीवनमान, त्यांच्या गरजा, त्यांचे पुनर्वसन, त्यांचे तणाव कमी करण्याचे प्रयत्न, भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप इत्यादींची सविस्तर रूपरेषा सांगितली आहे. त्यांच्या प्रयोगाच्या काही निष्कर्षावरून, समन्वयाद्वारे आणि कायद्याद्वारे संघर्ष नष्ट करता येतो. जनता आणि शासकीय अधिकारी (पोलीस) यांनी अनौपचारिकरित्या एकत्र येऊन प्रयत्न केला तर विकासाचा विचार कृतीत उतरतो. निर्णय प्रक्रियेमध्ये कनिष्ठ नोकरशहाचा (पोलीस कर्मचारी) सहभाग करून घेण्याची गरज काम सुधार मंडळाच्या योजनेतून पूर्ण होते.[५]

(खोपडे सुरेश : २००३ : ३९२)

लघु शोध निबंधासाठी पोलीस दलात होणारा राजकीय हस्तक्षेप, कर्मचाऱ्यांच्या गरजा, तणाव यांच्या संदर्भासाठी या पुस्तकाचा उपयोग झाला.

६) माने माणिक यांनी 'दक्षता' अंकात दिलेल्या 'मद्यपान : पोलीस, कायदा आणि समाज' या लेखामध्ये त्यांनी पोलीस दलातील मद्यपानाच्या वाढत्या समस्येसंदर्भात केलेल्या पाहणीची स्पष्ट माहिती दिली आहे. त्यानुसार गेल्या दशकापासून पदवीधर किंवा उच्च शिक्षित तरूण अन्यत्र रोजगार संधी न मिळाल्याने पोलीस दलात भरती होत आहेत. उच्च शिक्षित वरिष्ठ व उच्च शिक्षित कनिष्ठ यांच्यातील संबंध हे परस्पर अविश्वासाचे, संशयाचे व तणावग्रस्त असल्याने कनिष्ठांमध्ये एक प्रकारचा गंड जाणवला. दुसरे सार्वत्रिक कारण म्हणजे मुंबई, पुणे व इतर मोठ्या शहरातून पुरेशी निवासस्थाने उपलब्ध नाहीत. साहजिकच, अनेक विवाहीत व अविवाहीत तरूण एकटे राहतात. आपल्या कुटुंबियांपासून त्यांची फारकत होते. कायदे किंवा इतर तत्सम संस्थांपेक्षा आई-वडील, पत्नी, मुले हेच बेताल वर्तनाचे नियंत्रण उत्तम करू शकतात. परिणामी, हे पोलीस कर्मचारी ड्युटी व्यतिरिक्तचा जास्तीत जास्त वेळ बाहेर घालवतात. तिसरे कारण हे पोलीस कार्य पध्दतीशी आणि प्रशासनाशी निगडीत आहे. पोलीसांना अमुक ते तमुक वाजेपर्यंत

ड्युटी नसते, रात्री-अपरात्री कर्तव्य बजावण्यासाठी हजर व्हावे लागते, गुन्ह्याचा तपास, बंदोबस्त किंवा 'शांतता व सुव्यवस्था' या मोघम शब्दांपलीकडे सर्वसामान्य नागरिकांना फारसे ठाऊक नसते. पण रोजची दैनंदिन कामे, त्यांचे स्वरुप उदा. : वाहतूक नियंत्रण, अपघात, सांप्रदायिक हिंसाचार, मोठमोठे बंदोबस्त, सातत्याने होणारे प्रवास या सगळ्यांचा येणारा मानसिक, शारीरिक थकवा, कौशल्य दाखविण्याची संधी न मिळणे ही कारणे मद्यपानाला पोषक पार्श्वभूमी तयार करतात. बढतीची संधी न मिळणे हे ही कारण आहे.

त्याचप्रमाणे पैशाची आणि दारूची सहज व हवी तेव्हा उपलब्धता. नियमित पगाराव्यतिरिक्त पोलीसांना काही चिरीमिरी, भेटी वा अन्य रूपाने मिळत असते. दुसरी बाब १५ ऑगस्ट, २६ जानेवारी वेळोवेळी जाहीर होणाऱ्या 'ड्राय डे' दिवशी पोलीसांना प्रश्नच पडत नाही. वरील सगळ्या कारणांचा एकत्रित परिणाम म्हणजे निर्व्यसनी पोलीस प्यायला शिकतो. प्रस्तुत लेखात त्यांचा पोलीसांचे समर्थन व वस्तुस्थितीचे चित्र स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे.(६)

(माने माणिक : 'दक्षता' सप्टेंबर, १९९८ : ३९-४०)

७) डॉ. पांडे रेखा आणि श्री. सुभाष जोशी यांनी **"Gender Issues In the Police"** या संशोधनात महिला पोलीसांचे कार्य, भूमिका, पोलीस दलातील नोकरी आणि त्यांचे एक स्त्री म्हणून अस्तित्व, पुरूषांचा महिला पोलीसांबद्दलचा दृष्टिकोन, समाजाचा दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी केलेला यू.पी. आणि एम.पी. येथील महिला पोलीसांच्या अभ्यासावरून, बहुसंख्य महिला पोलीसांचे पोलीस दलातील नोकरी स्वीकारण्याचे कारण वैयक्तिक स्वार्थ आहे. महिला पोलीसांच्या मते पुरूष आणि स्त्री भेदभाव भूमिका प्रदान करताना केला जातो. त्यांच्यातील बढती होणाऱ्यांची संख्या कमी आहे. तर पुरूष पोलीसांच्या दृष्टिकोनातून स्त्रियांना आपल्या करिअरचा उत्साह आणि जाणीव नसते. पांडे आणि जोशी यांनी महिलांच्या दुर्बलतेची कारणे सांगितली आहेत. महिला पोलीसांवर जास्त दबाव कौटुंबिक जबाबदारीचा, त्याचप्रमाणे आत्मविश्वासाची कमतरता, निर्णय घेण्याची कमी क्षमता, अपुऱ्या सुविधा, योग्य प्रशिक्षण न मिळणे अशी सर्व कारणे त्यांनी सांगितली आहेत.(७)

**(Dr.Pande and Shri. Joshi : 04.06.2007 : Google Search : 7 to 12)**

८) महम्मद बिन मुहम्मद आणि के. एस. शुक्ला यांनी केलेल्या **"Women Police in India (1974)'** या संशोधनात महिला पोलीसांची कार्ये आणि भूमिका (पोलीस दलातील

विविध विभाग) अभ्यास केला आहे. त्यांनी काढलेल्या निष्कर्षानुसार, महिला पोलीसांना पुरूषांप्रमाणेच शिक्षण दिले जाते. कायद्यानुसार त्यांच्या ड्युटी (कार्य) मध्ये फरक केला जात नसला तरी प्रत्यक्षात मात्र महिला पोलीसांना वारंवार ठराविक साचेबंद कामे दिली जातात, जी त्यांच्या स्वभावाला शोभतील. भारतातील महिला पोलीस प्रामुख्याने स्त्रिया आणि मुले यांनी केलेल्या गुन्ह्याचा शोध, तपासणी, हरविलेल्या स्त्रिया आणि मुलांचा शोध घेणे, काही संवेदनशील ठिकाणी पहारा ठेवणे, स्त्री कैद्यांना अटक, त्यांचा तपास, त्यांच्यावर पहारा ठेवणे, विमानतळ ड्युटी, माहिती गोळा करणे, अल्पवयीन गुन्हेगारांना पकडणे, स्त्री कैद्यांना पुरावा, साक्षीदार म्हणून सादर करणे, अल्पवयीन मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार यांचा शोध, मोर्चे, स्त्री कामगार मोर्चे अशा ठिकाणी बंदोबस्त, महत्वाची बस स्थानके, रेल्वे स्टेशन या ठिकाणी महिलांना मदत करणे, व्ही.आय.पी. संरक्षण ड्युटी अशी कामे करावी लागतात.[८]

(**Mahmood Bin Muhammad and K.S.Shukla : 1974 : 30-31**)

प्रस्तुत लघु शोध निबंधासाठी 'कर्तव्य पार पाडताना स्त्री पोलीसांना पुरूषांइतकेच समान हक्क मिळतात का ?' हे जाणून घेण्यासाठी या संशोधनातील संदर्भाचा उपयोग झाला.

९) **G. P. Joshi** आणि **J. C. Arora** यांनी केलेल्या **"Welfare Facilities Available to Police Personnel in the Country (1986)"** यामध्ये पोलीस कल्याण योजनांच्या क्षेत्रात किती प्रमाणात वाढ झाली आहे आणि विविध राज्यातील पोलीसांच्या कुटुंबांना कोणत्या योजनांचा लाभ होतो याचा अभ्यास केला आहे. नॅशनल पोलीस कमिशनला खालील क्षेत्रावर भर द्यावा लागतो. उदा. : पोलीस घर बांधणी, पेन्शन, आरोग्य सुविधा, शैक्षणिक सुविधा, बचत योजना, विशिष्ट रजा, फंड, पोलीस ऑफिसर्स, कुटुंब कल्याण, कँटीन आणि सहकारी दुकाने. त्यांनी काढलेल्या निष्कर्षावरून विविध पोलीस दलापर्यंत कल्याण योजनांचा विस्तार अजून झाला नाही. फक्त काही राज्ये या संदर्भात प्रगती करू शकली आहेत. गुजरात ह्या राज्याने ५०% निवासस्थानाच्या सोयी मिळविल्या आहेत. गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, मध्यप्रदेश आणि केरळ ही राज्येच उच्च प्रमाणात पोलीस निवासीस्थानाची उपलब्धता मिळवू शकली आहेत. तर एकीकडे आसाम, जम्मू काश्मीर, त्रिपुरा, बिहार, मणिपूर या राज्यांची निवासस्थानाच्या उपलब्धतेची पातळी फारच कमी आहे.[९]

(**G. P. Joshi and J. C. Arora : 1986 : 102**)

या संशोधनातून विविध राज्यातील पोलीस निवासस्थान उपलब्धतेची माहिती मिळाली.

१०) **R. C. Tripathi, R. K. Naidu, K. Thapa and S. N. Biswas** यांच्या **"Stress, Health and Performance'** या संशोधनात उत्तर प्रदेशातील पोलीसांवर पडणाऱ्या ताण-तणावांची कारणे शोधून काढली आहेत. त्यांच्या अभ्यासावरून कामाचे अनियमित तास, रजेची समस्या, सामाजिक जीवनाचा अभाव, बढती नाही, कुटुंबाकडे दुर्लक्ष आणि कुटुंबापासून विभक्त, जीवनाची जोखीम, सरकारचा पाठिंबा नसणे, अपुरी रचना, वरिष्ठांचा दबाव, राजकीय दबाव, वारंवार बदली, ऑफिसर्सचा दृष्टीकोन, मुलांचे शिक्षण, अपुरे जेवण, कमी पगार यातून पोलीसांमध्ये विविध ताण-तणावांची निर्मिती होते.[१०]

(**R.C.Tripathi, R. K. Naidu, K. Thapa and S. N. Biswas : 1993 - 120**)

वरील संशोधनातून प्रस्तुत शोध निबंधासाठी पोलीसांवर पडणाऱ्या विविध ताण-तणावांची कारणे समजून घेण्यासाठी यातील संदर्भाचा उपयोग झाला.

११) **S. M. Channabasavanna** यांच्या **'Mental Health Problems among Police Personnel - An Epidemiological Study' (1996)** या संशोधनात पोलीसांचे मानसिक आरोग्य आणि ताण-तणावासंबंधीत समस्यांचा अभ्यास केला आहे. बेंगलोर, धारवाड आणि दिल्ली येथील पोलीसांवर पडणाऱ्या मानसिक ताण-तणावांची कारणे त्यांनी शोधून काढली. भरपूर काम, कामाचे वाढीव तास, वरिष्ठांचा दबाव, वरिष्ठांकडून छळवणूक, अपुऱ्या सुविधा, कामाची असुरक्षितता, कुटुंबासाठी अपुऱ्या सुविधा या सर्व समस्या, कारणे त्यांच्यात (पोलीस) मानसिक ताण-तणावांची निर्मिती करण्यास कारणीभूत आहेत.[११]

(**S. M. Channabasavanna : 1996 : 153**)

प्रस्तुत लघु शोध निबंधासाठी, पोलीसांवर पडणाऱ्या मानसिक ताण-तणावांची कारणे जाणून घेण्यासाठी, संदर्भासाठी वरील संशोधनाचा उपयोग झाला.

१२) कश्यप रिजवाना यांनी 'दक्षता' या पोलीस अंकात 'मंथन - पोलीस कुठे कुठे पुरा पडणार' या शीर्षकाखाली पोलीसांच्या कामाची व्यथा मांडली आहे. त्या म्हणतात, पोलीस व समाजाचा एकमेकांशी संबंध म्हणजे अे नेसेसरी इविल ! पोलीसांच्या विरोधात लोक सतत बोलतात. मात्र कुठेही, काहीही करायचं म्हटलं किंवा होत नाही म्हटलं तर त्यांना पोलीसच

लागतात : दहीहंडीपासून पोलीस बंदोबस्त सुरू होतो. गणेशोत्सवात विसर्जनाच्यावेळी चाळीस चाळीस तास पोलीस उभे असतात. त्यांचे पाय इतके सुजतात की कित्येकदा पायातून शूज कापून काढावे लागतात.

'पर्यावरणाचा कार्यक्रम' असेल तर तेथील कचरा, प्लॅस्टीकच्या पिशव्या, बाटल्या हे सर्व रोखायला लोकांना पोलीसच लागतात. 'हेल्मेट सक्ती' - हेल्मेट घालणं हे स्वसुरक्षिततेसाठी आवश्यक आहे, पण त्यासाठीही लोकांना पोलीस लागतो. त्याचप्रमाणे रिक्षामधून पालक मुलांना अक्षरश: कोंबून पाठवितात. ही गोष्ट पालकांना समजत नाही. शाळेच्या अधिकाऱ्यांना दिसत नाही. तिथेही पोलीसांनाच ॲक्शन घ्यावी लागते. पोलीस कुठे कुठे पुरा पडणार ? १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, शांततेच्या काळात म्हणजे युध्द सुरू असताना सीमा सुरक्षा दल सीमेवर तैनात असतं. सी.आर.पी.एफ. (सेंट्रल रिझर्व्ह पोलीस फोर्स) चे जवान तैनात असतात. देशांतर्गतही नक्षलवाद्यांकडून सतत पोलीसांची हत्या होत असते. त्यांच्या कुटुंबियांचे नंतर काय होते याची कितीजण दखल घेतात ? सैनिकांसाठी सुविधा असतात, तशा पोलीसांसाठी नसतात. रेशन, कॅन्टीन, मिलिटरी, हॉस्पीटल, छावणीतले कॉर्टर्स हे सर्व हमखास असतं. युध्दानंतर वर्गणी त्यांच्यासाठी गोळा होते. भारतीयांचा घास त्यांच्यासाठी अडतो. त्या म्हणतात, पोलीसांतली माणसंही याच समाजातली. म्हणजे त्यांचे संस्कार वेगळे नाहीत. मग दुजाभाव का ?

पोलीस चौकीत कित्येकदा प्रसाधनगृह नसतं. लेडी कॉन्स्टेबलला तिथे कपडे बदलायला जागा नसते. तिथूनच एखाद्या स्त्री गुन्हेगाराला बाहेरगावी घेऊन जाण्याची ऑर्डर आली तर साधं लघवीलाही जाता येत नाही. समाजाने या समस्यांकडे पाहिलंय ?[१२]

(रिजवाना कश्यप : 'दक्षता' : नोव्हेंबर-डिसेंबर, २००४ : ८-९)

महिला पोलीसांना मिळणाऱ्या पोलीस स्टेशनमधील अपुऱ्या सुविधा याचा संदर्भ मांडताना या लेखाचा उपयोग प्रस्तुत शोध निबंधासाठी झाला.

१३) डंगवाल परमेश लिखित - 'आय डेअर' हे पुस्तक म्हणजे किरण बेदींसारख्या तेजस्वी स्त्रीचे चरित्र. या पुस्तकात परमेश डंगवाल यांनी किरण बेदी यांचे बालपण, एक पोलीस अधिकारी, तिहार कारागृह सुधारणा ते किरण बेदीनंतर तिहार कारागृह या सर्वांचे चित्रण त्यांच्या चरित्रात केले आहे. २६ जानेवारी, १९७३ दिल्ली पोलीसांच्या बक्षिसपात्र

तुकडीचे संचलन / नेतृत्व प्रथम करणाऱ्या एक स्त्री अधिकारी किरण बेदी यांची चाणक्यपुरी येथे पहिली नियुक्ती, उप-विभागीय पोलीस अधिकारी म्हणून झालेली नियुक्ती, ५ नोव्हेंबर १७७९ रोजी राजपथावर शिखांच्या मोर्चाशी फक्त एका लाठीने दिलेला लढा, या शौर्याबद्दल 'पोलीस मेडल फॉर गॅलंट्री' पुरस्कार, त्यांचा विवाह, टेनिस खेळाची आवड, किरणच्या आयुष्यावर आधारित 'स्त्री' आणि 'इन्स्पेक्टर किरण' या सारख्या सादर झालेल्या टी.व्ही.मालिका, साऊथ डिस्ट्रीक्ट पोलीसांची उघड केलेली अकार्यक्षमता, मदर तेरेसांबरोबरची भेट, १९८२ साली दिल्लीतील आशियाई क्रीडा स्पर्धावेळी डी.सी.पी. किरण बेदी यांनी केलेले वाहतूक नियंत्रण, खुद्द पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या गाडीवरसुध्दा (**DHI 1817**) केलेले 'चलान', दिल्लीहून गोव्याला पोलीस उपायुक्त (वाहतूक) पदावर झालेली बदली, किरण बेदी यांच्या मुलीला झालेला 'नेफ्रायटीस' हा आजार. आणि त्या काळात मुलीपासून दूर, नाकारलेली रजा, 'बीट बॉक्स' पध्दत, ''नवज्योती दिल्ली पोलीस फाऊंडेशन फॉर करेक्शन डीअ‍ॅडीक्शन अँड रिहॅबिलिटेशन'' ही संस्था उभारणी, चक्रता आणि तुनी या दोन तालुक्यातील शेतामधील अफूची रोपे उपटून टाकणे, अंमली पदार्थ नियंत्रण खात्यात उपसंचालक म्हणून काम करत असताना राष्ट्रीय पातळीवर केलेले काम, 'इंटरपोल' सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेशी कामाची देवाण-घेवाण, 'द परफॉर्मन्स अ‍ॅप्रेजल सिस्टीम' (कामाची मूल्यमापन पध्दती) हा सादर केलेला प्रबंध, वकिलांचा संप-किरणवर प्रहार, शपथ घेण्यास नकार, वधवा आयोग, मुलीला वैद्यकीय शाखेत घेताना झालेला राजकीय त्रास, महा-निरीक्षक म्हणून तिहार तुरूंगामध्ये झालेली नेमणूक, तेथे केलेल्या सुधारणा, नेतृत्व गुण, तिहारचे धडे, गृहखात्याने तिथले पद सोडून जाण्याचा अचानक दिलेला आदेश, दिल्ली पोलीस मुख्यालयातल्या दक्षता शाखेची उपायुक्त म्हणून झालेली नियुक्ती, किरण नंतरचा तिहार, किरणची सुस्पष्ट मते, मिळालेले पुरस्कार असा सारा प्रवास डंगवाल यांनी सादर केला आहे.

डंगवाल म्हणतात, तेवीस वर्षाच्या नोकरीच्या काळात श्रीमती किरण बेदी यांनी एक महिला पोलीस अधिकारी म्हणून अद्वितीय किर्ती मिळविली. त्यांना खच्ची करण्याचे अनेक प्रयत्न केले गेले. पण त्यांनी नेहमीच फिनिक्स पक्षाप्रमाणे घेतलेली भरारी, आपल्या संपूर्ण करिअरमध्ये किरण बेदी यांनी कैद्यांना त्रासदायक ठरणाऱ्या परिस्थितीविरूध्द काम केले. त्रासदायक परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला. उद्देश हाच की, ज्या हेतूसाठी ही

व्यवस्था आहे, तोच हेतू साध्य व्हावा. स्वार्थाने बजबजलेली चौकट, अहंकार, उदासीन आणि बेजबाबदार वृत्ती यांत काम करताना मनावर असंख्य ओरखडे उठले. भावना पोळल्या. कधी कधी पीछेहाट होऊनही प्रयत्न चालू असणे.

प्रवाह कितीही वेगवान आणि जोरदार असला, तरी त्या प्रवाहाविरूध्द पोहणाऱ्या एका कर्तव्यशील स्त्रीची ही कहाणी आहे.[१३] (परमेश डंगवाल, फेब्रुवारी, १९९६)

१४) खरात सिध्देश्वर जनार्दन यांच्या 'कोल्हापूर जिल्ह्यातील पदवीधर असलेले पोलीस कॉन्स्टेबल आणि पदवीधर नसलेले पोलीस कॉन्स्टेबल यांच्या स्व-संकल्पनेचा त्यांच्या व्यावसायिक ताणावर होणारा परिणाम अभ्यासणे' या शोध निबंधात त्यांनी खालील निष्कर्ष काढले आहेत.

१) पदवीधर असलेले आणि नसलेले पोलीस कॉन्स्टेबल त्यांच्या स्व-संकल्पना कमी असल्याने व्यावसायिक ताण पातळीतील सहसंबंध उच्च स्वरुपाचा दिसून आला. २) व्यावसायिक ताणाला कारणीभूत असलेल्या दुर्बलता या घटकाशी शारीरिकता या घटकांचा कनिष्ठ सहसंबंध दिसून आला. तर दुर्बलता या घटकाशी ऋणात्मक सहसंबंध दिसून आला. ३) सामाजिकता या घटकाचा 'गट व राजकीय दबाव' या घटकाशी कनिष्ठ सहसंबंध दिसून आला. ४) पदवीधर पोलीस कॉन्स्टेबल यांच्यामध्ये 'स्वाभाविकता' या घटकाचा 'व्यक्तीची जबाबदारी' या घटकाशी कनिष्ठ सहसंबंध दिसून आला. तर पदवीधर नसलेल्या पोलीस कॉन्स्टेबल यांच्यामध्ये 'स्वाभाविकता' या घटकाचा 'व्यक्तीची जबाबदारी या घटकाशी ऋणात्मक सहसंबंध' दिसून आला. ५) दोहोंमध्ये 'नैतिकता' या घटकाचा 'अतिरिक्त भूमिका भार' ह्या घटकाशी कनिष्ठ सहसंबंध दिसून आला.[१४](खरात सिध्देश्वर : २००६ : ३६-३७)

# विभाग दुसरा

# संशोधन पध्दती

## (Research Methodology)

प्रस्तावना :

प्रस्तुत लघु शोधनिबंध 'कोल्हापूर शहरातील महिला पोलीसांचा समाजशास्त्रीय अभ्यास' या प्रस्तुत संशोधनासाठी अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचे विवेचन प्रस्तुत विभागात केले आहे. समस्येचे विधान, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहीतके, संशोधन क्षेत्र, संशोधन आराखडा, तथ्य संकलन पध्दती, समस्येचे विधान, संशोधनाच्या मर्यादा इत्यादींचे विवेचन पुढीलप्रमाणे :-

'कोल्हापूर शहरातील महिला पोलीसांचा समाजशास्त्रीय अभ्यास'

**'A Sociological Study of Women Police in Kolhapur City'**

प्रस्तुत अहवालातील समस्येचे विधान पुढीलप्रमाणे -

१. समस्येचे विधान : (**Statement of the Study**)

प्रस्तुत अभ्यासामध्ये मुख्यत: पोलीस म्हणून असणारे समाजातील स्त्रीचे सामाजिक स्थान, आर्थिक स्थैर्य, कौटुंबिक आणि कार्यालयीन अडचणी, या क्षेत्रातील पदार्पणाची गरज इत्यादी गोष्टींचा उहापोह करण्याचा मानस आहे.

**"To discuss various aspect of women in Police Department, especially their social status, economic stability, difficulties in family life, office work and why they attract towards this field."**

२. संशोधनाची उद्दिष्ट्ये :- (**Objectives of the Study**)

१. महिला पोलीसांच्या सामाजिक - आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

   **To Study the Socio-economic conditions of women police.**

२. कामात होणारा राजकीय हस्तक्षेप अभ्यासणे.

   **To Study the Political interference in course of duty.**

३. लोकांकडून, पुरूष अधिकाऱ्याकडून मिळणारी वागणूक आणि कामामध्ये पडणाऱ्या मर्यादांचा अभ्यास करणे.

**To Study the treatment given by Public (Society) and Male Senior Officer and her limitation to the job.**

४. तिच्यावर पडणारी घरची बंधने आणि तिची आरोग्य स्थिती यांचा अभ्यास करणे.

**To Study her family obligations and health conditions.**

३. गृहीतके : (**Hypothesis**)

१. महिला 'पोलीस दलात' प्रथम पर्याय म्हणून सामील होत नाहीत.

**Women do not join police force as a first option.**

२. महिला पोलीसांची भूमिका ही तिच्या वडील, पती यांच्या भूमिकेशी आणि सामाजिक-आर्थिक दर्जाशी संबंधित आहे.

**Police Women's role is related to her father's / husband's role and their social-economic status.**

३. महिला पोलीसांना समाजातील लोकांकडून/समाजाकडून नकारात्मक मान्यता मिळते.

**Women Police get negative sanction by Society.**

४. महिला पोलीसांच्या कौशल्याचा योग्य वापर करून घेतला जात नाही.

**The skills of women police are not properly utilized.**

५. महिला पोलीसांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा फारशा समाधानकारक नाहीत.

**The facilities for women police are not satisfactory.**

६. महिला पोलीसांची आरोग्य स्थिती फारशी समाधानकारक नाही.

**The health condition of women police is not satisfactory.**

४. अभ्यास क्षेत्र : (**Field of Study**)

अभ्यासासाठी मर्यादीत आणि सोयीस्कर क्षेत्र निवडणे हे उत्तम निष्कर्षासाठी आवश्यक असते. त्यासाठी 'कोल्हापूर शहरातील महिला पोलीसांचा समाजशास्त्रीय अभ्यास' या संशोधनासाठी कोल्हापूर शहराची निवड करण्यात आली. कोल्हापूर जिल्ह्याचे ठिकाण आहे. कोल्हापूर शहराचे भौगोलिक स्थान १६° ४२' उत्तर अक्षवृत्त आणि ७४° ४५' पूर्व रेखावृत्त हे असून शहराचे क्षेत्रफळ ६७.२३ चौ.कि.मी. आहे. 'कोल्हापूर' या दक्षिण

महाराष्ट्रातील औद्योगिक, सांस्कृतिकदृष्ट्या प्रगल्भ आणि राजर्षि छत्रपती शाहूंच्या प्रेरणेने पुरोगामी आणि परिवर्तन विचारांशी बांधील असलेल्या शहराची निवड प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात आली. जिल्हा पोलीस प्रशासनामार्फत जिल्हा, शहर पातळीवर कायदा-सुव्यवस्थेचे काम पार पाडले जाते. कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाची व्यवस्था, ग्रामीण विभाग, करवीर विभाग, शाहुवाडी विभाग, कोल्हापूर शहर विभाग आणि गडहिंग्लज विभाग या पाच विभागांतर्गत मोडते. त्यामुळे अभ्यास सोयीस्कर होण्यासाठी आणि योग्य निष्कर्षासाठी कोल्हापूर शहर विभागाची निवड केली. शहराच्या सुरक्षिततेच्या प्रश्नाचा सर्व भार पोलीस यंत्रणेवर आहे. कायदा सुव्यवस्थेतील एक घटक म्हणून पुरूषांइतकाच महिलांचाही (महिला पोलीस) सहभाग या यंत्रणेत आहे. या दृष्टिकोनातून महिला पोलीसांच्या भूमिका सादरीकरण आणि त्यांच्या समस्या यांचा उहापोह करण्याचा मानस आहे. त्यामुळे कोल्हापूर शहराची निवड केली.

कोल्हापूर शहर पोलीस प्रशासन व्यवस्था दोन विभागात मोडते.

१. विभाग एक :

जुना राजवाडा पोलीस ठाणे, शाहुपूरी पोलीस ठाणे, लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे आणि राजारामपुरी पोलीस ठाणे.

२. विभाग दोन :

पोलीस मुख्यालय आणि त्याअंतर्गत येणाऱ्या शाखा उदा. : नियंत्रण कक्ष, कोल्हापूर, जिल्हा विशेष शाखा, नागरी हक्क संरक्षण शाखा, श्वानपथक, शहर वाहतूक नियंत्रण शाखा, विमानतळ, महिला अत्याचार निवारण कक्ष, मोटार परिवहन, बिनतारी संदेश यंत्रणा आणि पोलीस मुख्यालय कक्ष इत्यादी.

## ५. समग्र : **(Universe)**

कोल्हापूर शहर पोलीस प्रशासन व्यवस्था कोल्हापूर जिल्ह्याअंतर्गत मोडते. कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण पोलीसांची संख्या १९८१ असून पैकी महिला पोलीसांची संख्या १४६ आहे. कोल्हापूर शहर पोलीस मंजूर संख्या ८४१ असून पैकी ७८१ पोलीस हजर आहेत. त्यापैकी पुरूष ७१३ आणि महिला पोलीस एकूण ६८ कार्यरत आहेत.

## ६. वैश्विक सर्वेक्षण : **(Census Survey)**

कोल्हापूर शहर पोलीस प्रशासनातील महिला पोलीसांची सद्यस्थितीतील एकूण

संख्या ६८ आहे. हा समग्र लहान असल्याने नमुना निवड पध्दती या अभ्यासासाठी आणि योग्य निष्कर्षासाठी फारशी उपयुक्त नाही. त्यासाठी कोल्हापूर शहर पोलीस प्रशासनात कार्यरत असणाऱ्या महिला पोलीसांचा अभ्यास करताना वैश्विक सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला. त्यानुसार ५२ उत्तरदात्यांकडून संरचित मुलाखत अनुसूचीद्वारे माहितीचे संकलन केले.

७. संशोधन आराखडा : **(Research Design)**

अन्वेषणात्मक संशोधन आराखडा **(Exploratory Research Design)** या आराखड्याची निवड केली.

राष्ट्रीय जाणीव, सामाजिक बांधिलकी आणि महिला पोलीसांच्या अस्थैर्याचा ऐरणीवर टांगलेला प्रश्न सोडविणे हा प्रकल्पाचा उद्देश असल्याने, संशोधन कार्याबाबतीत योग्य धोरण ठरविण्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला. 'शास्त्राची प्राथमिक स्थिती म्हणजे अन्वेषणात्मक अध्ययन होय.'

**"Exploratory Studies represent the earlier Stage of a science."**

**- D. Kant Z.**

८. तथ्य संकलन पध्दती : **(Techniques of Data Collection)**

संशोधनासाठी खालील प्राथमिक आणि दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला.

१. प्राथमिक स्त्रोत : **(Primary Source)**

महिला पोलीसांच्या प्रत्यक्ष मुलाखती, गट चर्चा, निरीक्षण आणि पोलीस मुख्यालय कार्यालय येथून माहितीचे संकलन केले.

२. दुय्यम स्त्रोत : **(Secondary Source)**

या प्रकल्पाच्या अनुषंगाने ग्रंथालयामधील उपलब्ध ग्रंथ, पोलीस परिक्षेत्रासाठी निवडलेली मासिके, पोलीस अधिकाऱ्यांची चरित्रे, पोलीसांवर आधारीत लेख, वर्तमानपत्रे, इंटरनेटवरून काही आर्टिकल्सचा वापर केला आहे.

प्रस्तुत संशोधनात, तथ्य संकलनासाठी मुलाखत पत्रिकेचा **(Interview Schedule)** चा वापर करण्यात आला. अभ्यासाची उद्दिष्ट्ये समोर ठेऊन मुलाखत अनुसूची तयार केली. त्यानंतर पोलीस मुख्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर येथून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना संशोधन विषयाची माहिती देऊन परवानगी घेतली. महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची ड्युटीची

वेळ, ड्युटीचे ठिकाण, बदलणाऱ्या ड्युटी यांची माहिती करून घेतली. सदर मुलाखत अनुसूचीची पूर्व चाचणी घेण्यात आली. तेथे काही प्रश्नांमध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या. काही प्रश्न वगळले, काही नवीन प्रश्न समाविष्ट करण्यात आले.

त्यानुसार सुधारीत मुलाखत अनुसूची तयार केली. वेगवेगळी पोलीस ठाणे आणि पोलीस मुख्यालय त्याअंतर्गत असणाऱ्या शाखा, उत्तरदात्या महिला पोलीसांची बदलणारी ड्युटीची ठिकाणे येथे जाऊन, त्यांना प्रकल्पाचा विषय विशद करून दिला आणि प्रत्यक्ष महिला पोलीसांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन माहिती मिळविली आहे.

## ९. माहितीचे संकलन : **(Data Collection)**

दिनांक १४.१२.२००७ ते २८.१२.२००७ आणि दिनांक ०२.०१.२००८ ते १०.०३.२००८ या कालावधीत माहितीचे संकलन केले.

## १०. वर्गीकरण आणि विश्लेषण : **(Classification and Data Analysis)**

संकलित केलेल्या माहितीचे सांकेतीकरण करून सदरची माहिती संगणकात भरण्यात आली आणि त्यावर प्रक्रिया करून ती माहिती सारणीमध्ये भरली. सारण्यांच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले. सदर माहितीचा समावेश लघु शोधनिबंधात करण्यात आला आहे.

## ११. महिला पोलीस : **(Defination of Women Police)**

"भारतीय पोलीस सेवेमध्ये 'महिला पोलीस' ही स्वतंत्र संकल्पना नाही. त्यामुळे पोलीस भरती ही लिंगभेदविरहीत असते. परंतु महिला पोलीस ही संकल्पना मुख्यत: ज्या महिला पोलीस स्वतंत्र महिला पोलीस भरतीच्या वर्गवारीसाठी आवेदनपत्र सादर करतात आणि त्यांची निवड स्वतंत्र महिला पोलीस वर्गवारीमध्ये होते, अशा महिलांसाठी वापरली जाते."

– शमिम अलिम.

**(Shamim Aleem : 1991 : P-7)**

## १२. मर्यादा : **(Limitation of the Study)**

प्रस्तुत संशोधन करताना संशोधकाला संशोधन कार्यामध्ये अनेक मर्यादा आल्या. या मर्यादा दूर केल्यास यापेक्षाही चांगले निष्कर्ष मिळतील. संशोधन करताना पडलेल्या मर्यादा पुढीलप्रमाणे :-

१. संरचित मुलाखत अनुसूचीस परवानगी देताना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी केलेली दिरंगाई.

२. मुलाखत अनुसूचीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाकारलेले प्रश्न.

३. मर्यादीत स्वरूपाचा समग्र.

४. उत्तरदात्या (महिला पोलीस) च्या बदलणाऱ्या ड्युटी.

५. काही उत्तरदात्यांनी मुलाखत देण्यास केलेली टाळाटाळ.

६. प्रतिक्रिया देताना कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये असणाऱ्या वरिष्ठांच्या, प्रशासनाच्या भीतीचा, दबावाचा, प्रतिक्रियांवर परिणाम होतो. त्यामुळे उत्तरदाते प्रतिकूल प्रतिक्रिया देणे टाळतात.

१३. अहवाल प्रकरण योजना : **(Chapterlization Scheme)**

१. प्रकरण पहिले :

पोलीस यंत्रणेचा 'उदय' आणि भारतीय 'स्त्री' चा पोलीस प्रशासनात प्रवेश.

**The origin of Police System and Entry of Indian Women in Police Administration.**

२. प्रकरण दुसरे :

साहित्याचे परिशिलन आणि संशोधन पध्दती.

**Review of Literature and Research Methodology.**

३. प्रकरण तिसरे :

महिला पोलीसांची सामाजिक आर्थिक परिस्थिती.

**Socio-Economic Condition of Women Police.**

४. प्रकरण चौथे :

महिला पोलीसांवर पडणारे ताण-तणाव आणि त्याचे परिणाम.

**Stresses and Strains and it's impact (On Women Police).**

५. प्रकरण पाचवे :

सारांश, निष्कर्ष आणि सूचना.

**Summary, Conclusion and Suggestion.**

प्रस्तुत लघु शोधनिबंधासाठी वैश्विक सर्वेक्षण पध्दतीने माहितीचे संकलन केले. संरचित मुलाखत अनुसूचीद्वारे मिळवलेल्या सामाजिक-आर्थिक माहितीचे संघटन आणि सादरीकरण पुढील प्रकरण 'महिला पोलीसांची सामाजिक - आर्थिक परिस्थिती' यामध्ये केले आहे.

## संदर्भ :


१. Dr. Mahajan Amarjit, 'Indian Police Women', Deep and Deep Publication, New Delhi, 1981. P - 175 - 177.

२. Shamim Aleem, 'Women Police and Social Change', Ashish Publishing House, New Delhi, 1991, P - 81 - 83.

३. Ghosh S.K., 'Women in Policing', Light and Life Publication, New Delhi, 1981, P - 138 - 140.

४. वागळे वि.द., 'पोलीस आणि समाज',पुष्पक प्रकाशन, पुणे,१९८९ पृ. १४ - १५.

५. खोपडे सुरेश, 'नवी दिशा - पोलीस प्रशासनाची नवी दिशा', स्नेह प्रकाशन, २००३, पान नं.३९२.

६. माने माणिक, 'मद्यपान : पोलीस, कायदा आणि समाज', 'दक्षता', सप्टेंबर, १९९८, पान नं. ३९ - ४०.

७. Dr. Pande and Shri. Joshi, 'Gender Issues in the Police', down load from google search 4/16/2007.

८. Research Studies (1970 - 2006) Compendium, BRD, 2006, Mahmood Bin Muhammad and K. S. Shukla, 'Women Police In India' (1974), P - 30 - 31.

९. Research Studies (1970 - 2006) Compendium, BRD, G. P. Joshi and J.C.Arora, 'Welfare Facilities Available to Police Personnel in the Country (1986), P - 102.

१०. Research Studies (1970 - 2006) Compendium, (BPRD), R.C.Tripathi 'Stress, Health and Performance' (1993), P - 120.

११. Research Studies (1970 - 2006) Compendium, (BPRD), S. M. Channabassavanna 'Mental Health Problems among police personnel - An Epidemiological Study (1996), P - 153.

१२. कश्यप रिजवाना, 'मंथन - पोलीस कुठे कुठे पुरा पडणार' - 'दक्षता' नोव्हेंबर, डिसेंबर, २००४, पान नं.८ - ९.

१३. डंगवाल परमेश, 'आय डेअर', मेहता पब्लिशिंग हाऊस, फेब्रुवारी, १९९६.

१४. खरात सिध्देश्वर जनार्दन, 'कोल्हापूर जिल्ह्यातील पदवीधर असलेले पोलीस कॉन्स्टेबल आणि पदवीधर नसलेले पोलीस कॉन्स्टेबल यांच्या स्व-संकल्पनेचा त्यांच्या व्यावसायिक ताणावर होणारा परिणाम अभ्यासणे', एम.ए. - लघु शोधनिबंध, राजाराम महाविद्यालय.